राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज डेहराडून लेखाशीर्ष २२०२ ११९८ या योजनेसाठी पुनर्विनियोजनाद्वारे प्राप्त निधी वितरणास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः- पुनर्विनि-२०१७ /प्र.क्र.११८/ एसडी-५

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२

दिनांक :- ७ मार्च, २०१८

वाचा :-

१) शिक्षण संचालक यांचे पत्र क्र.शिसंमा/शिष्य/पुनर्विनि/१३४७३/१७-१८/२२४/५६५, दिनांक २२/०१/२०१८.

२) वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थस-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६/०२/२०१८.

३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.अनुवि/४९१७/३२/१७/अर्थसंकल्प, दिनांक १२/०१/२०१८ , दि.२१/०२/२०१८ व दि.६ मार्च, २०१८

४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.पुनर्वि २८१७/(५३/१७) अर्थसंकल्प दिनांक ६ मार्च, २०१८.

प्रस्तावनाः-

राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज डेहराडून, लेखाशीर्ष २२०२ ११९८ या योजनेसाठी सन २०१७- १८ करीता रु. २,२०,०००/- (दोन लक्ष वीस हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीत केलेली तरतूद १०० टक्के वितरीत करण्यात आली आहे. राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून या संस्थेत महाराष्ट्र राज्यातून इयत्ता ८ वी ते इ. १२ वी पर्यंत शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना दिनांक २५ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयान्वये शिष्यवृत्तीच्या रक्कमेत रु. २०,०००/- (अक्षरी वीस हजार रुपये फक्त) वरुन रु. ४०,०००/- (अक्षरी चाळीस हजार रुपये फक्त) करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. सदर वाढीव शिष्यवृत्तीचा लाभ जानेवारी, २०१७ च्या सत्रापासून नव्याने प्रवेश घेतलेल्या तसेच संस्थेत शिक्षण पुढे चालू ठेवलेल्या विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील.

२. सन २०१७-१८ करीता सदर योजनेसाठी रु. २,२०,०००/- एवढी तरतूद मंजूर आहे. त्यामध्ये रु. ३,३०,०००/- एवढी अतिरिक्त तरतूद आवश्यक आहे. विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहू नयेत म्हणून “२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण, (०४) अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी (०४) (०१) अवर्षणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी/ फी ची प्रतिपूर्ती, ३४-शिष्यवृत्ती/विद्यावेतने (२२०२ २५८८)” या लेखाशीर्षाखालील रु.५४३९ हजार एवढया रकमेमधून पुनर्विनियोजनाद्वारे रु. ३,३०,००० /- निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज डेहराडून या योजनेसाठी "२२०२ , सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण १०७, शिष्यवृत्त्या (००) (००) (०१) सैनिकी शाळा व महाविद्यालये, ३४-शिष्यवृत्ती/विद्यावेतने (२२०२ ११९८) " या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्प कार्यासनाच्या संदर्भाधीन क्र.३ व ४ येथील शासन निर्णयान्वये पुनर्विनियोजनाद्वारे रु. ३,३०,०००/- (रुपये तीन लक्ष तीस हजार फक्त) एवढी अतिरिक्त तरतूद उपलब्ध करण्यात आली आहे. सदर रक्कम बीम्स प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच सदर निधी आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना वितरीत केलेला आहे.

२. सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच सहाय्यक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे यांना या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणाऱ्या निधीकरिता आहरण व संवितरण अधिकारी यांना घोषित करण्यात येत आहे.

३. " २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण १०७, शिष्यवृत्त्या, (००) (००)(०१) सैनिकी शाळा व महाविद्यालये, ३४-शिष्यवृत्ती/विद्यावेतने (२२०२ ११९८) " या लेखाशिर्षाखाली सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून खर्च करण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २९/अर्थ-८ दि.०८/०२/२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर शासन निर्णय उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा सांकेतांक २०१८०३०७१७१४३३४५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Neha Nandkumar Humraskar

Digitally signed by Neha Nandkumar Humraskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fad9131f2c2ae9d6d9bb053715c4b9e08b15382beb01922a7bf2c233de3f7a45, cn=Neha Nandkumar Humraskar
Date: 2018.03.07 17:19:50 +05'30'

(नेहा हुमरसकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक,
२. मा. विरोधी पक्ष नेता विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र राज्य.
३. मा.प्रधान सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक
४. आयुक्त, शासकीय परीक्षा मंडळ, पुणे.
५. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
६. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

८. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद.

९. शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), बृहन्मुंबई.

१०. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.

११.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

१२. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

१५. वित्त विभाग (व्यय ५/अर्थोपाय/अर्थसंकल्प ६), मंत्रालय, मुंबई

१६. मेजर जनरल,जनरल ऑफिसर कमाडिंग, महाराष्ट्र एवं गुजराथ अेरिया,कुलाबा,मुंबई.

१७. कमांडंट राष्ट्रीय मिलिटरी कॉलेज, डेहराडून कॅन्टॉनमेंट (उत्तराखंड)

१८.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

१९. निवड धारिका एसडी.-५